# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 24/04/2023 (सोमवार) दुपार

---

### गैरकायदयाची मंडळी

पो.स्टे. जलालखेडा :– अंतर्गत २० कि. मी. अंतरावरील मौजा खराळा ता. नरखेड जि. नागपुर येथे दिनांक २३/०४/२०२३ चे ०६:०० वा. ते ०६:१५ वा. पावेतो यातील फिर्यादी नामे– सौ मीनल सचीन ठाकरे, वय २५ वर्ष रा. खराळा ता. नरखेड जि. नागपुर व आरोपी हे सख्खे नातलग असुन यांच्यात जमीनीचा वाद आहे फिर्यादी ही आपल्या पती व मुलाबाळांसह घरी हजर असता यातील **आरोपी नामे– १) सौ. हर्षा प्रमोद तभाने. २) चीराग प्रमोद तभाने ३) मयुरी प्रमोद तभाने तिन्ही रा. काटोल ४) कार्तीकी मस्के ५) चिंटु मस्के दोन्ही रा. काटी ६) नीतीन ठाकरे रा. खराळा ता. नरखेड जि. नागपुर** हे फिर्यादीचे घरी आले व फिर्यादीची नंनद आरोपी क्र. १ ही म्हणाली की तु मला नोटीस पाठवला याला कारणीभुत तुच आहे असे म्हणुन आरोपी क्र. १ व ६ यांनी फिर्यादी व तिचे पतीस काठीने मारहाण केली व आरोपी क्र. २ ते ५ यांनी सुध्दा घरात घुसुन फिर्यादी व तीचे पतीस गच्ची पकडुन हातभुक्कीने मारहाण केली त्यामुळे फिर्यादीचे पाठीला मुका मार लागला व डाव्या हाताच्या कोनी जवळ व बोटा जवळ खरचटले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीतांविरुध्द कलम १४३, १४७, १४८, ३२४, ४५२ भा.द.वी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोना प्रजोक तायडे ब. नं. १९४६ मो. क्र. ८३०८९६४७१४ हे करीत आहे.

### दुखापत

पो.स्टे. जलालखेडा :– अंतर्गत २० कि.मी. अंतरावरील मौजा खराळा ता. नरखेड जि. नागपुर येथे दिनांक २३/०४/२०२३ चे ०६:०० वा. ते ०६:१५ वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ हर्षा प्रमोद तभाने, वय ४० वर्ष, रा. आयु डीपी काटोल ता. काटोल जि. नागपुर व **आरोपी नामे– १) मीनल सचीन ठाकरे २) सचीन धनराज ठाकरे दोन्ही रा. खराळा ता. नरखेड ३) बाबाराव दंडारे ४) प्रेमाबाई बाबारावजी दंडारे दोन्ही रा तरोडा ता. कारंजा** हे सख्खे नातलग असुन यांच्यात जमीनीचा वाद आहे फिर्यादी ही घरासमोरून जात असतांना आरोपी क्र. १ हीने फिर्यादीला पाहुन शिवीगाळ केली फिर्यादीने तिला हटकले की शिवीगाळ कोणाला करते तु मला नोटीस पाठवला याला कारणीभुत तुच आहे असे म्हटल्यावर याच कारणावरून आरोपी क्र. १ व २ यांनी फिर्यादीस दोन्ही हातावर व पायावर व पाठीवर काडीने मारहाण करून शिवीगाळ करून पाहुन घेण्याची धमकी दिली. तसेच आरोपी क्र. ३ व ४ यांनी सुध्दा शिवीगाळ करून हातभुक्कीने मारहाण करून ढकलढुकल केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६, ३४ भा.द.वी. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोना प्रजोक तायडे बं. नं. १९४६ मो. क्र. ८३०८९६४७१४ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर